MHOS090005712023

# निशाणी क्र. १६ वरील आदेश

प्रतिवादी क्र. ०१ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांचेविरुध्द पारीत झालेला नि. १ वरील एकतर्फा आदेश रद्द होण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जामध्ये असे कथन आहे की, सदरील प्रकरणातील नि. क्र. १ वर एकतर्फा आदेश झालेला आहे. परंतु प्रतिवादी क्र. १ च्या मुलाने समन्स घेतल्यानंतर त्याच्या मुलाने प्रतिवादीस कल्पना दिली नाही, त्यामुळे प्रतिवादी दाव्यात हजर होवू शकला नाही. प्रकरण स्थावर मिळकतीबाबत असल्याने प्रस्तुत प्रकरणात योग्य तो आदेश होण्याकरीता म्हणणे दाखल करून घेणे गरजेचे आहे.

३. प्रस्तुत अर्जावर वादीने एकतर्फा आदेश रद्द करून मागण्याचा अर्ज हा जास्तीत जास्त खर्चाची रक्कम लावून अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

४. दोन्ही बाजूंना ऐकले. अभिलेखाचे अवलोकन केले.

५. प्रस्तुतचा दावा हा अडथळा करू नये असा निरंतर मनाई व मोजणी बाबतचा आहे. दाव्याची सदयस्थिती ही उर्वरीत प्रतिवादींच्या उपस्थितीकरीता होती. दि. २५.०४.२०२३ रोजी समन्स मिळाल्यानंतर हजर न झाल्याने प्रतिवादी क्र. १ यांचेविरूध्द दि. ०७.११.२०२३ रोजी

नि. १ वर एकतर्फा आदेश झालेला आहे.

**६.** सदरचा अर्ज विचारात घेता नैसर्गिक न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून उभयपक्षकारांना आपापली बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. परंतु, अर्ज मंजुर करताना वादींचे झालेले आर्थिक व वेळेचे नुकसान दुर्लक्षित करून चालणार नाही. प्रतिवादी क्र. १ यांचेविरूध्द दि. ०७.११.२०२३ रोजी एकतर्फा आदेश झाल्याचे दिसून येते. सदर आदेशापासून जवळपास ३१ महिन्याचा अवधी गेला आहे. तरी समन्स बजावणी होवून जवळपास ३८ महिन्याचा उशीर झाला आहे. प्रकरणाची सद्यस्थिती व विलंब लक्षात घेता न्यायाच्या दृष्टीकोनातून मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज वादीला प्रतिवादी क्र. १ यांनी रक्कम रूपये १५००/— इतका खर्च वादीला व तालुका विधी सेवा समिती कळंब यांना रक्कम रूपये ५००/—देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वरील आदेशाची पुर्तता केल्यास केल्यास प्रतिवादी क्र. १ यांच्याविरूध्द नि. १ वर एकतर्फा आदेश रद्य समजण्यात येतो.

३. प्रतिवादी क्र. १ यांना आदेशित करण्यात येते की, पुढील तारखेस त्यांनी त्यांचे म्हणणे अभिलेखावर दाखल करावे.

स्वाक्षरीत/—

दिनांक : ०१/०७/२०२६
ठिकाण : कळंब.

( श्रीमती ए.डी. जाधव)
३ रे सह दिवाणी न्यायाधीश,
क. स्तर, कळंब.